R.No. MHAMAR/25/A3029

दैनिक
E-mail : dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

R.No. MHAMAR/25/A3029
लातूर
वर्ष : ६ वे, अंक नं. : १०२
दि.०२ एप्रिल २०२६,वार: गुरुवार
पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## कार्यकर्त्यांना अधिक सक्षम आणि अद्यावत करण्याचा भाजपाचा प्रशिक्षणातून प्रयत्न-युवा नेते ऋषिकेश कराड

लातूर- भारतीय जनता पार्टी ही कार्यकर्त्यांची पार्टी असून कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा बलस्थान आहे सक्षम कार्यकर्ता घडला तरच पार्टी सक्षम घडणार आहे याच उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण शिबिरातून कार्यकर्त्यांना अधिक सक्षम आणि अद्यावत करण्याचा भाजपाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.




लातूर तालुक्यातील भाजपाच्या मुरुड मंडलातील कार्यकर्त्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते नांदगाव येथील कौशल्या सिल्क येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर मार्गदर्शक तुकाराम गोरे, मंडलाध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील आणि भाजयुमो मंडलाध्यक्ष किरण मुंडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या निवासी प्रशिक्षण शिबिरास मुरुड मंडळातील १०८ भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी बूथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख सहभागी झाले होते.

सेवाभाव वृत्तीतून काम करणारे भाजपाचे कार्यकर्ते अधिक सक्षम व्हावे, त्यांच्यात जनसेवेची आणि देशभक्तीची भावना अधिक निर्माण व्हावी यासाठी भाजपाच्या वतीने सर्वत्र प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जात असल्याचे सांगून ऋषिकेशदादा कराड यांनी भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजनामुळे जनतेच्या जीवनमानात मोठी सुधारणा होत असल्याचे सांगून भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या विविध कल्याणकारी योजना गोरगरीब सर्वसामान्य गरजू पर्यंत पोहोचण्याचे काम करावे असे आव्हान केले.

प्रारंभी मंडल अध्यक्ष सुरज शिंदे यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनामाची भूमिका विशद केली सूत्रसंचालन दिलीप पाटील यांनी केले. या प्रशिक्षण वर्गात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अमलबजावणी, सोशल मीडिया या विषयावर विविध क्षेत्रात तुकाराम गोरे, रोहिदास वाघमारे, महेश कणसे, दिलीप पाटील, प्रशांत साखरे यांच्यासह इतर अनेकांनी अत्यंत प्रभावी मनोगत व्यक्त केले.

## सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांनी मासिक विवरणपत्र ३० एप्रिलपूर्वी ऑनलाईन सादर करणे बंधनकारक

लातूर : सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांना कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाईन सादर करणे सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणारा अधिनियम १९५९ व त्याअंतर्गत नियमावली १९६० नुसार बंधनकारक असल्याने विवरणपत्र तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

केंद्र व राज्य शासन, अंगिकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालयाचे https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर नियोक्त्यांच्या लॉगइन मध्ये ईआर-१ सादर करताना पोर्टलवर एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब) वर क्लीक करुन एम्प्लॉयर लॉगइन मध्ये युजर आयडी व पासवर्ड वापरुन लॉगईन करुन डॅशबोर्डवरील ईआर-१ ऑप्शनवर क्लीक करावे, त्यानंतर एंटर ईआर-१ वर क्लीक करुन तिमाही विवरणपत्र ईआर-१ ऑनलाईन सादर करता येईल. याचा वापर करुन ३० एप्रिल, २०२६ अगोदर ईआर-१ विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. हे विवरणपत्र सादर करताना काही तांत्रिक अडचण आल्यास ०२३८२-२९९४६२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## सहकारी संस्थांच्या चौकशीसाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या नामतालिकेसाठी, ३० एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर: महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८३ व ८८ अन्वये संस्थांच्या चौकशीसाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नामतालिका तयार करण्यात येणार असून, यासाठी सहकार विभागातील ७० वर्षांखालील निवृत्त अधिकारी, निवृत्त न्यायाधीश, वकील आणि सनदी लेखापाल यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी दिली आहे.

या प्रक्रियेसाठीचे विहित अर्ज १ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत विभागीय सहनिबंधक कार्यालय लातूर, तसेच लातूर, धाराशिव, बीड व नांदेड येथील जिल्हा उपनिबंधक आणि सर्व सहायक निबंधक कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. इच्छुकांनी पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह याच मुदतीत संबंधित कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एसटीच्या एनसीएमसी स्मार्ट कार्डचे लोकार्पण

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने विविध सामाजिक घटकांसाठी प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्यात येत आहे. याच दिशेने ‘ठींझरू जप-ढहश-त्रे’, एनसीएमसी (छउचउ) सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मंत्रालयात करण्यात आले.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्यासह सर्व मंत्री व एसटी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.




यावेळी अमृतमहोत्सवी ज्येष्ठ नागरिक रमेश ढावरे, तसेच सवलतधारक महिला संगीता पालकर व वर्षा कांबळे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला तसेच विविध सवलतधारक प्रवाशांना आधार क्रमांकाशी संलग्न एनसीएमसी (छउचउ) स्मार्ट कार्ड वितरित करण्यात येणार आहे. या कार्डच्या माध्यमातून प्रवाशांना एसटी बस प्रवासातील सवलतींचा लाभ अधिक सुलभतेने मिळणार असून, प्रवास व्यवस्थापन अधिक डिजिटल व पारदर्शक होणार आहे.

## सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यासाठी कार्यवाही करावी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे

मुंबई : राज्यातील विविध ठिकाणी उभारण्यात आलेले सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू राहण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.



घरगुती आणि औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासंदर्भात मंत्रालयात मंत्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, सहसंचालक (जल) जगन्नाथ साळुंखे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार हे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

पर्यावरण मंत्री मुंडे म्हणाल्या की, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था तसेच औद्योगिक आस्थापनांकडून सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येते. आतापर्यंत उभारण्यात आलेले प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू रहावेत, यासाठी आवश्यक मनुष्यबळ भरती होण्यास वेळ लागणार आहे. तोपर्यंत कंत्राटी तत्वावर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे. तसेच ज्या ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू झालेले नाहीत, त्या स्थानिक स्वराज्य संस्थांना नोटीस देऊन हे प्रकल्प लवकर सुरू करण्यात यावे.

## लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी दिलासा; ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

मुंबई,: मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत लाभ घेणाऱ्या महिलांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ होती. मात्र राज्यात उद्भवलेले अवकाळी पावसाचे व गारपीटीचे संकट, तसेच लाभार्थी महिलांकडून झालेली मागणी यांचा विचार करून ही मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सूचनेनुसार घेण्यात आला आहे.



अधिकाधिक पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळावा आणि कोणत्याही महिलेची गैरसोय होऊ नये, या उद्देशाने ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

ज्या महिलांच्या अर्जामध्ये त्रुटी आहेत किंवा ई-केवायसी अपूर्ण आहे, ज्यांची चुकीची माहिती भरली गेली होती किंवा तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले होते अशा महिलांना ई-केवायसी दुरुस्ती करण्यासाठी अतिरिक्त कालावधी उपलब्ध करून दिला आहे. त्यांनी ३० एप्रिल पर्यंत प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## संपादकीय...

### डोनाल्ड ट्रम्प मानवतेचा हत्यारा ही बाब अमेरिकेच्या ८० लक्ष नागरिकांनी जगाला पटवून दिली.

जगात अनेक राजे-महाराजे झालेत, हिटलर सारखे क्रूर शासक सुद्धा झाले.परंतु डोनाल्ड ट्रम्प यांनी या संपूर्ण हद्दी पार करून मानव,पशुपक्षी, वित्तीय हाणी या संपूर्ण बाबींची हद्द पार केल्याचे दिसून येते.डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून दगा दिला ही बाब जगजाहीर आहे आणि तेच काम अमेरिका इराण सोबत युद्ध करून इस्त्रायलच्या बाबतीत करू शकते.कारण अमेरिका कोणाचाच झाला नाही आणि होणार सुध्दा नाही ही बाब त्यांच्या वागणुकीवरून स्पष्ट दिसुन येते.अमेरिकेने सुपर पॉवरच्या नावाखाली जगाला अंधक्कारात नेवून ठेवले आहे व जगातील मित्र देशांना धोका देत आहे.डोनाल्ड ट्रम्प सांगतात की आम्ही जी कारवाई इराणवर करीत आहोत ही मानवतेच्या आणि जगाच्या कल्याणासाठी करीत आहो अशा भुलथापा मारून जगातील देशांची दिशाभूल करण्याचे काम डोनाल्ड ट्रम्प करीत आहे. डोनाल्ड ट्रम्प या युध्दाच्या माध्यमातून इराणला नमविण्याचा प्रयत्न करीत आहे.परंतु इराण अमेरिका-इस्त्रायलला जशास तसे उत्तर देवून दोघांनाही घाम सोडून त्यांची जागा दाखवित आहे.या युध्दामागचा अमेरिकेचा एकच उद्देश आहे तो मिडलिस्टमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे व तेल कंपन्यांनवर आपला कब्जा व्हावा याकरीता इरानच्या ४५० किलो युरेनियमवर त्याचा डोळा आहे.कारण इराणने जर अनुबॉम्ब बनविला तर उत्तर कोरियाचा तानाशाह किंग्ज जॉन उन सारखी वारंवार धमकी इराण आपल्याला नेहमीच देईल अशी भिती अमेरिकेला वाटत आहे. त्याचप्रमाणे या युध्दाच्या माध्यमातून खर्ग आणि होर्मुझवर आपले वर्चस्व रहावे व खाडी देश आपल्या नियंत्रणात राहून तेल उद्योगांवर आपली पकड मजबूत करण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी हे विनाशकारी युद्ध छेडल्याचे दिसून येते.परंतु डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकडीपणामुळे आणि अतिरेकामुळे संपूर्ण मिडलिस्ट युद्धाच्या खाईत होरपळत आहे यात आबालवृद्ध, विद्यार्थी, मुल,निरअपराध नागरिक,पशुपक्षी यांना आपले प्राण मुकावे लागत आहे. या युध्दात इराणचा काहीच दोष नाही. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणला मुद्दाम युद्धासाठी उकसविले आणि आज त्याचा जगावर विपरीत परिणाम होऊन आर्थिक, मानवीय, वित्तीय हाणी दिवसेंदिवस गंभीर वाढत आहे. सोबतच या युद्धामुळे रेडियेशन वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.अमेरिका आणि इस्त्रायलला वाटत होते की हे युद्ध ४ ते ५ दिवसांत संपेल परंतु इराण,अमेरिका-इस्त्रायलचा बाप निघाला आणि अनेक मोर्चावर अमेरिका-इस्त्रायलला परास्त करून जशास तसे उत्तर देत आहे ही इराणच्या दृष्टीने गौरवास्पद बाब आहे.कारण छोटासा देश बलाढ्य देशाला जेव्हा टक्कर देतो तेव्हा बलाढ्य देशांची घाबरगुंडी उडते.या संपूर्ण युद्धजन्य परिस्थिती वरून लक्षात येते की डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहु यांनी सापाच्या बिळात हात टाकून मोठी चूक केली असावी.कारण आज एक महिना झाला तरी इराण अमेरिका-इस्त्रायलवर वार-पलटवार सुरूच आहे त्याच्या बहादुरीची सराहना केली पाहिजे.इराणचे टॉप लिएंडर व कमांडर मारल्या गेले तरीही इराण थोडासाही डगमगला नाही हा इराणचा प्लस पॉइंट आहे.माझ्यामते अमेरिकेने हे युद्ध ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा इराण अमेरिकेला अनेक गंभीर जखमा देऊ शकतो.हे युद्ध थांबविण्यासाठी जगाने अमेरिका -इस्त्रायलवर दबाव टाकला पाहिजे.कारण या युध्दाचे समर्थन नाटोसह जगातील कोणीही करायला तयार नाही.इराण-अमेरिका-इस्त्रायल युद्ध दिवसेंदिवस अक्राळविक्राळ रूप घेत आहे आणि याचा परिणाम पुढे चालून महाभयानक होण्याची दाट शक्यता आहे.कारण अमेरिका-इजरायलने इराणला घायाळ करून अनेक जखमा दिल्या आहेत.त्यामुळे इराणकडून युद्ध थांबने शक्य नाही याकरिता हे युद्ध अमेरिकाच थांबवू शकतो अन्यथा याचा गंभीर परिणाम अमेरिका-इस्त्रायलसह मिडलिस्ट व संपूर्ण जगाला भोगावा लागेल.कारण अमेरिकन जनतेकडुन युद्धाचा कडाडून विरोध होत आहे याचाच अर्थ असा की, अमेरिकन जनता डोनाल्ड ट्रम्प यांच्या युध्दाच्या कारवाईच्या विरोधात असल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या एक महिन्याच्या काळात युध्दामध्ये मृतांची सरकारी आकडेवारी हजारोंच्या संख्येने सांगितली जात असली तरी लाखोंच्या संख्येने मानवीय हाणी झाली आहे व अरबो-खरबो रूपयांची वित्तीय हाणी झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत घातक क्षेपणास्त्रे,ड्रोन आणि विध्वंसक शत्रसामुग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे हे सर्व विनाशकारीचे लक्षणं आहेत. पश्चिम आशियात जनुकाय क्षेपणास्त्र-ड्रोनचा पाऊस पडत आहे की काय असे सुरू आहे.ट्रम्पच्या चुकीच्या निर्णयामुळे अमेरिका-युरोपमध्ये ३३०० ठिकाणी डोनाल्ड ट्रम्पच्या विरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू आहे आणि याचे पडसाद जगभर उमटायला सुरुवात झाली आहे.डोनाल्ड ट्रम्प विरोधी आंदोलन फक्त अमेरिकेपुरते सिमित रहाले नसुन याचे पडसाद जगातील अनेक देशात पसरले आहे.कारण या युध्दाचा परिणाम बेरोजगारी व महागाईच्या रूपात जगातील प्रत्येक व्यक्तीवर पडत आहे. मदत न मिळत असल्याने ट्रम्प तिलमिला झाले आहे आणि त्यांनी मित्र देशांना आपली नाराजी व्यक्त करत म्हटले आहे की,जा आणि स्वतः तेल मिळवा.कारण आमच्याकडे भरपूर तेल आहे. अमेरिकेने इराणच्या महत्वपूर्ण ठिकाणांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे त्यामुळे इराणने अमेरिकन कंपन्यांना लक्ष करण्यात येईल असा इशारा इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डने (आयआरजी सी) दिला आहे.यात मायक्रोसॉफ्ट,गुगल,पल,इंटेल, आयबीएम, टेस्ला, आणि बोइंगसह १८ कंपन्यांचा यात समावेश असल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.यावरून स्पष्ट होते की, अमेरिका इराणला जेवढे जखमा देईल त्यापेक्षा जास्त घाव आयआरजीसी अमेरिका व इस्त्रायलला देईल ही बाब स्पष्ट झाली आहे. त्यामुळे अमेरिकेने युध्दाला सुरुवात केली आणि आता त्यामुळे हे विनाशकारी युद्ध अमेरिकेनेच स्वतःच थांबविले पाहिजे.

# भिमजयंती कशी साजरी करायची ?.डी जे च्या तालावर कि विचारांच्या जोरावर?

विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांची जयंती साजरी करण्याची संधी दरवर्षी येते.त्यामुळे वर्षभरात आम्ही शिक्षण,आरोग्य आणि रोजगार व्यक्तिगत पातळीवर काय प्रगती केली त्याचे एडीट करीत नाही.पण सामाजिक,शैक्षणिक,संस्कृती,धर्मिक आणि राजकीय यांचे एडीट झाले पाहिजे. असाच कायदा भारतीय राज्यघटना लिहणाऱ्या घटनाकारांनी भारतीय संविधात लिहून ठेवला आहे.तो जर आम्हाला लागू होत असेल तर त्याचा ताळेबंद स्वताचा स्वताला सदर केला पाहिजे. दरवर्षी यांची थोडी ही खंत आम्हाला वाटली पाहिजे,पण ती वाटत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल,१८९१ ६ डिसेंबर,१९५६), हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ,अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य समाजाच्या लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली,तसेच देशातील महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले.त्यांना न्याय,हक्क आणि अधिकार मिळवून दिले.आजच्या घडीला ज्यांना आम्ही दोष देतो त्यांचेच आम्ही सर्व प्रकारचे ग्राहक आहोत.आमचे कोणते ही उत्पादन नाही. भीम जयंतीला दरवर्षी लागणारे सर्व प्रकारचे साहित्य गुजर मारवाडी सहा महीने अगोदर गुंतवणूक करून तयार करून घेतो. आमचे स्वताचे कार्यालय,बुद्ध विहार नाहीआम्ही काय करतो?..लाइटिंग,डेकोरेशन,डी जे साठी अशोक लेंडर ट्रक गाडी किंवा लांब टेलर ट्रक,विद्युत पुरवठा करणारे जनरेटर हे आमच्या मंडळाचे असावे असे कोणालाच का वाटत नाही.उद्योग धंदा निर्माण करावा असे नियोजन का नसावे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४१ साली ब्रिटीश गवर्नर मध्ये कामगार मंत्री असतांना काय काय कामगार कायदे बनवून देशातील असंघटीत कष्टकरी कामगार, मजुरांना दिले यांची थोडी सुद्धा जाणीव आजच्या असंघटीत कष्टकरी कामगारांना नाही.तोच तो झोपडपट्टीत राहणारा,ग्रामीण गावांतील खेड्यात पाड्यात राहणारा असंघटीत कामगार भिम जयंती एक दिवस नाही तर पांच,दहा दिवस साजरी करीत असतो.किती दिवस कोणते उपक्रम राबविणार त्यांची लेखी माहिती देतात.आणि वर्ष भरात कोण कोणते सामाजिक,शैक्षणिक सांस्कृतिक,कला,क्रिडा प्रोत्साहन देणारे प्रेरणादायी उपक्रम राबविले त्याची माहिती दिली पाहिजे. आरक्षणाचे लाभार्थी सुरक्षित नोकरी करणारे आणि सुरक्षित ठिकाणी राहणारे काय करतात?.अन्याय अत्याचाराच्या विरोधातील जन आंदोलनात कधी स्वता भाग घेतात काय?. त्यांची बायको मुलमुली कधी भाग घेण्यासाठी सहभागी होतात काय?.याचाही गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कोणते ही क्रांतिकारी विचार आम्ही शांत डोक्याने मेंदूत कधीच घेतले नाही.त्यामुळेच त्याचा जमाखर्च ताळेबंद कागदावर लेखी मांडणे अश्यक्य आहे. आम्ही संघटित कामगार असण्यापेक्षा असंघटित कामगार मजूर जास्त आहोत,यांची जाणीव बाबासाहेबांना होती म्हणूनच त्यांची कामगारांच्या समस्या व उपाय यावर अभ्यासपूर्ण मांडणी होती.हे त्यांनी १९४१ सालीच लिहून ठेवले होते, त्यांची कामगार चळवळी बाबत विशेष भाषणे होती. देशातील पहिली सफाई कामगारांची मुंबई म्युनिसिपल कामगार संघ ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३७ साली युनियन मुंबईत बांधली होती.मुंबई म्युनिसिपल कामगार संघाचे कार्यालय परळ मध्ये होते.ते या कार्यालयात बसून काम पाहत होते.१९४१ साली तिचे पाच हजार सभासद होते,आजच्या घडीला मुंबईसह राज्यात देशातील सर्व महानगरपालिका,नगरपालिका, नगरपरिषद,नगरपंचायत आणि ग्रामपंचायत मध्ये ३६५ दिवस चालणारे साफसफाई काम कंत्राटी पध्दतीने चालविल्या जाते,आणि ९० टक्के कामगार हे मागासवर्गीय म्हणजेच बाबासाहेबांचा जय जय कार करणारे आहेत.ते कोणत्या विचारधारेच्या कामगार संघाचे सभासद आहेत हा संशोधनाचा विषय आहे.म्हणूनच लिहतो भिमजयंती कशी साजरी करायची ?.डी जे च्या तालावर कि विचारांच्या जोरावर ?. कारण मी १९८२ पासून असंघटीत नाका,कामगार,घरकामगार यांच्या न्याय हक्क व प्रतिष्ठेसाठी लढणाऱ्या सत्यशोधक कामगार संघटनेचा आणि स्वयंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्याचा

कार्यकर्ता,पदाधिकारी म्हणून काम करतो. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भिमजयंती साजरी करणारा.विचारांची जयंती साजरी करीत नाही.तो दरवर्षी डी जे च्या तालावर बेधुंद होऊन नाचतो. दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे देण्यासारखे घेण्यासारखे काहीच नसते.मनुवादी विचारांचा कार्यकर्ता मात्र शांत डोक्याने एक एक कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने रचनात्मक काम करून संविधानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर हळूहळू संपवायला निघाला आहे.यांची जाणीव आपणास नाही.घटनेतील बाबासाहेबांनी लिहून ठेवले जागृत रहा तुमच्यासाठी रात्र नव्हे तर दिवसही वैऱ्याचा असेल. आताच प्रयत्नशील राहा नाहीतर औलाद होईल तुझी मुकी बहिरी ओरडून सांगेल जगाला घटना लिहली बापाने पण टिकवली नाही त्याच्यां लेकाने म्हणण्याची पाळी येईल. भिमजयंती कशी साजरी करायची डोके असणाऱ्यांनी शांतपणे विचार करून नियोजन करावे.आम्ही वर्षभर कोणाचे ग्रहाक असतो. आमच्या कुटुंबाला लागणाऱ्या अन्न धान्या सह सर्व वस्तु आम्ही आमच्याकडून घेण्यासाठी लागणारी व्यवस्था का निर्माण करत नाही. मग बाबासाहेबांचा कोणता आदर्श आमच्या डोळ्यासमोर आहे?.

विषमतावादी विचारांचे लोक शांत डोक्याने संविधान संपवून नियोजन करीत आहेत.त्यानुसार ते हिंदुराष्ट्र बनविण्यासाठी कटिबद्ध आहेत.आम्ही बहुसंख्याने भीमजयंती साजरी करणार डी जे च्या तालावर, नाचून गाऊन घोषणाबाजी करणार हम भिम कि औलाद अंगार है बाकी सब भंगार है. तुम्ही फक्त भिम जयंतीनिमित्त करत राहणार राज्यघटनेचा जय जय कार. ते मात्र घटनेचाच एक एक कलमावर घालत राहतील घाला. त्यानुसारच त्यांनी खाजगीकरण करून आरक्षण तर संपविलेच आहे.शिक्षण,आरोग्य महाग करून ठेवले. तुमच्यासाठी काय आहे?. तर कायमस्वरूपी काम करणारा कंत्राटी कामगार म्हणूनच तुमची ओळख निर्माण केली जात आहे. म्हणूनच भिमजयंती कशी साजरी करणार?. डी जे च्या तालावर कि विचारांच्या जोरावर?. आताच ठरवावे लागेल.

कशी करावी भिम जयंती साजरी.१३५ वी भीमजयंती निमित्याने.स्वताचे घर,परिसर स्वच्छ ठेवावा. शक्य असेल तर घरांना रंग द्यावा.कपडे नवीन घेता येत नसतील तर आहेत तेच स्वच्छ धुवून घ्यावेत.घरावर रोशनाई करावी. घरासमोर दिव्यांचा झगमगाट करावे.आहारासाठी गोड पदार्थ करावेत.मद्यपान करु नये.घरातील सर्वांना नवीन शुभ्रवस्त्र घ्यावेत. घरासमोर सडा रांगोळी काढावी. घरोघरी दारासमोर बाबासाहेब यांची सुंदर प्रतिमा ठेऊन पुष्पहारांनी पूजन करावे. प्रत्येक घरी निळया ध्वजाचे ध्वजारोहन करावे.यावेळी शेजारी मित्रपरीवारास निमंत्रीत करावे. ध्वजारोहन झाल्याबरोबर मुलांनी फटाके वाजवून आनंद व्यक्त करावा. मित्र,नातेवाईकांना फराळ द्यावा.घरात बाबासाहेबांच्या गीतांची हलकी धून ठेवावी.शक्य झाल्यास बाबासाहेब यांची पुस्तके,फोटो,गीतांची सीडी ई.एकमेकांना भेट द्यावीत.जयंती उत्सव दिन ठरल्यानंतर (सार्वजनिक) व्याख्यान, समाजप्रबोधनपर कार्यक्रम मिरवणुकीपुर्वी एक दिवस किंवा मिरवणुक पार पडल्या नंतर ठेवावा. मिरवणुकी दरम्यान फक्त बाबासाहेब व बुद्ध गीत वाजवावीत.आपली गीते लाखापेक्षा जास्त आहेत.मिरवणुकी दरम्यान वादविवाद टाळावेत.शांतता राखावी लोकांनी मिरवणूक गेल्या नंतर नांव काढले पाहिजे.मद्यपान करु नये तर बाबासाहेबाच्या अभिमानाची अशी नशा व्हावी की तिच्यापुढे दारुची नशा झक मारावी.

जयंतीनिमित्य वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करावे.जयंतीची वर्गणी फक्त आंबेडकरी जनतेकडूनच घ्यावी.स्वतः होऊन जर कोणी वर्गणी देत असल्यास स्विकारावी. आपल्या कमाई तील विसावा हिस्सा सामाजिक,शैक्षणिक उपक्रमात दान करावा.त्यातूनच समाजातील हुशार विद्यार्थी व सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे सत्कार करावेत. कल्पकतेने जे काही चांगले.करता येण्यासारखे आहे ते जरुर करावे.ही भिमजयंती आगळी वेगळी जगावेगळी साजरी करावी.जगात एक ही राष्ट्र किंवा राज्य नाही जिथे भिम जयंती साजरी होत नाही.ती त्यांच्यासाठी प्रेरणादायी रचनात्मक कार्य करणारी असते.आपल्यासाठी कशी असावी ही भिमजयंती.म्हणूनच भिमजयंती कशी साजरी करणार?. डी जे च्या तालावर कि विचारांच्या जोरावर प्रेरणादायी ठरावी. तर डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचा जय जय कर होईल. अन्यता धांगडधिंगा,घालून विचाराची जाहीरपणे हत्या होत आहे असे कोणी बोलू नये.यांची दक्षता घ्यावी हीच १३५ व्या भिम जयंती निमित्याने बाबासाहेबाचा जय जयकर करणाऱ्यांकडून अपेक्षा.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडूप,मुंबई.**

# क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित करावेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ हा कालावधी द्विशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. या द्विशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे कार्य, विचार पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे नेण्याची संधी असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यावर आधारित विविध कार्यक्रमांची वार्षिक दिनदर्शिका बनवून वर्षभर कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्याचे निर्देश दिले.

मंत्रालयात आयोजित क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे करण्यासाठी गठीत समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आदी उपस्थित होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गठीत समितीमध्ये संलग्नित विभागाने किमान दोन ते तीन कार्यक्रमांचे आयोजन करावे. अशा प्रेरक कार्यक्रमांचे नियोजन १५ एप्रिल पर्यंत देण्यात यावे. महात्मा जोतिराव फुले यांचे मूळ गाव खानवडी (ता. पुरंदर, जि. पुणे) येथील त्यांच्या स्मृती जपणाऱ्या जिल्हा परिषद शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. या द्विशताब्दी जयंती वर्षाची सुरुवात ११ एप्रिल रोजी सीबीएससी शिक्षण, आधुनिक सुविधांनी युक्त खानवडी जिल्हा परिषद शाळेच्या लोकार्पण कार्यक्रमाने करावी.

यासाठी गठीत मंत्री समितीच्या अंतर्गत वर्षभर कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करणे, या कार्यक्रमांचे संनियंत्रण करण्यासाठी उपसमितीची निर्मिती करावी. महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित असलेल्या साहित्य संपदेचा बहुभाषेत अनुवाद झाला पाहिजे. जेणेकरून सबंधित भाषिक नागरिकांना त्यांच्या भाषेत साहित्य उपलब्ध होईल. शालेय शिक्षण विभागाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये खासगी शाळांनाही सहभागी करून घ्यावे. प्रत्येक मंत्री, विभागाने दिलेल्या सूचनांचे एकत्रीकरण करून त्यावर आवश्यक कार्यवाही करावी.

यावेळी सबंधित मंत्री यांनी आपल्या विभागाकडील नियोजनाची माहिती दिली. तसेच हे द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमांबाबत सूचना दिल्या. सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे यांनी बैठकीत माहिती दिली.

# ज्ञान,शक्ती,भक्ती,ऊर्जा व बुध्दिमत्तेचा अथांग सागर महाबली हनुमान.

महाबली हनुमान सर्वांचेच संकट मोचन आहेत.हनुमान जन्मोत्सव दरवर्षी चैत्र पौर्णिमेला येत असते.चैत्रशुध्द प्रतिपदेला गुढीपाडवा म्हणजेच हिंदू धर्माचे नवीन वर्ष, यानंतर चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्मोत्सव आणि चैत्र पौर्णिमेला हनुमान जन्मोत्सव साजरा केल्या जाते.भगवान प्रभु रामचंद्र विष्णुचे अवतार आहे तर महाबली हनुमान शंकरजींचा अवतार आहे.मुख्यत्वेकरून हनुमानाची पूजा रूईच्या फुलांनी केली जाते.भारतात हनुमान जन्मोत्सवाला पुजाअर्चना करून भव्य शोभायात्रा मोठ्या प्रमाणात काढण्यात येते.महाबली हनुमान हे राम भक्त होते. त्यांच्याजवळ ज्ञान आणि गुनांचा मोठा भंडार होता.त्याचप्रमाणे आपल्यावर जेव्हा-जेव्हा संकटे ओढावतात तेव्हा-तेव्हा आपण हनुमानाला साकडे घालत असतो म्हणूनच हनुमानाला संकटमोचन म्हटल्या जाते.हनुमानाने रावण दरबारी रामाचे दुत म्हणुन चोख भुमिका बजावली.रावण महाग्यानी व राजनितीज्ञ होता. परंतु अहंकारी असल्याने त्याने संपूर्ण मर्यादांचे उल्लंघन करून हनुमानाच्या शेपटीला आग लावली. परंतु याचा रावणावर विपरीत परिणाम झाला. कारण हनुमान रामाचे दुत म्हणून रावण दरबारी गेले होते.त्यामुळे हनुमानाने संपूर्ण लंका आगीच्या स्वाधीन करून लंका दहन केले आणि हनुमानाने आपल्या रामभक्तीचे, ज्ञानाचे व शक्ती प्रदर्शन केले. कारण रामाचे संकट म्हणजे स्वत:चे संकट असे हनुमान समजत आणि रामाच्या सुरक्षेसाठी असुरी शक्तीचा संहार करण्यास मदत केली व असुरी शक्तीचे पानीपत केले.महाबली हनुमान रामकथेतील मुख्य सुत्रधार समजल्या जाते.कारण राम, लक्षण,सिता यांच्या सोबत हनुमानाची भुमिका वटवृक्षाच्या सावली सारखी अफाट असल्याचे दिसून येते.तीच प्रतीकृती आज भारतात प्रत्येक मोहल्लात व गावात दिसून येते. मोहल्या-मोहल्यात व गावा-गावागातील जवळपासच्या पटांगणामध्ये हनुमानजींचे मंदिर दिसुन येते.कारण गावातील कठीण प्रसंग असो किंवा आपल्या स्वत: वरील कठीण प्रसंग असो किंवा आनंदाचा प्रसंग असो किंवा शुभ प्रसंग अशा प्रसंगी सर्वच महाबली हनुमान यांना साकडे घालुन आलेले संकट व येणारे संकट दुर करण्यासाठी आणि सुख:शांती निर्माण व्हावी यासाठी पुजाअर्चना केली जाते व साकडे घातले जाते. श्रीराम,लक्षण व सीता १४ वर्षे वनवासात असतांना बजरंबली हनुमान व त्यांच्या संपूर्ण वानरसेनेणे सुरक्षा कवच बनुन कार्य केले.कारण बजरंबली हनुमान अहोरात्र रामाचाच जप करायचे म्हणुनच रामाचा जय-जयकार करतांना रामासोबतच हनुमानाचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. याप्रमाणे सीयाबल रामचंद्र की जय पवनसुत हनुमान की जय म्हणजेच जीथे राम तीथे आपल्याला बजरंग बली हनुमान दिसून येतो.सीतामाई यांनी ठरवीले की आपल्यासाठी रावणासारख्या बलाढ्य शत्रुशी वानरसेनेणे आणि हनुमान यांनी लढा दिला म्हणुन प्रत्येकाला काहीतरी द्यायचे म्हणून भेट वस्तू दील्या.यात हनुमानाचा पराक्रम पाहून त्या अती प्रसन्न होत्या.त्यामुळे हनुमानाला आगळीवेगळी मोठी वस्तु भेट देण्याचे ठरवीले.अशावेळी सीतामाईने आपल्या माहेरवरून मिळालेला नवरत्नाचा हार हनुमानाला आदरतीत्थाने भेट दिला. हनुमानाने हाराचा सन्मानाने स्वीकार केला.परंतु काही क्षणात हनुमानाने हारातील मनी दातांनी तोडायला सुरुवात केली. सीतेच्या तळपायाची आग मस्तकात गेली व हनुमानाला जाब विचारला तेव्हा हनुमान म्हणाले माई ज्या वस्तुत राम- सीता नाही त्याचा मला काय उपयोग?मी रामभक्त आहे असे म्हणत हनुमानाने आपली छाती फाडून आपल्या ह्दयात राम-सीता आहे हे सीतामाईला दाखवून दिले.हनुमानाची भक्तीपाहुन प्रभुश्रीराम म्हणाले तुझे माझ्यावर एवढे ऋण आहे की मी तुला काय भेट देणार?यावर हनुमान म्हणाले हे प्रभुरामचंद्र द्यायचेच असेल तर एकच आशिर्वाद द्या,जीथे-जीथे तुमचे भजन-किर्तन सुरू असेल त्याचे श्रवण करण्याची मला संधी द्या.यावर श्रीराम तथास्तु म्हणाले! तेव्हापासून जिथे-जिथे रामनाम सुरू असते, रामाचा गजर होतो तिथे-तिथे महाबली हनुमानाचे नाव आदराने आपोआप येते.हनुमान जन्मोत्सवाला सर्वांनीच पवनपुत्र महाबली हनुमान यांना साकडे घालुन धरतीवरील बदलत्या हवामानामुळे वाढते प्रदुषण रोखण्यासाठी व प्राणवायूची मात्रा वाढवीण्यासाठी देशातील संपूर्ण हनुमान भक्तांनी हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.कारण युद्धजन्य परिस्थिती व वाढते औद्योगिकीकरण यांमुळे सर्वत्र वातावरण प्रदूषित होत आहे.करीता वृक्ष लागवडीमुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन व प्राणवायू मिळण्यास मोठी मदत होईल याचा फायदा मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतु यांना मोठ्या प्रमाणात मिळेल. यामुळे आपल्याला पृथ्वीतलावर हनुमान प्रगट झाल्याचे अवश्य दिसून येईल. सध्याच्या परिस्थितीत सोशल मीडियाच्या युगात आजचा युवा वर्ग बुध्दीने जरी हुशार आणि तर्बेज असला तरी शारीरिक दृष्ट्या परीपक नाही.महाबली हनुमान हे शक्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येकांनी हनुमानाचे नामस्मरण करून आपल्या आरोग्यासाठी दररोज व्यायाम करणे गरजेचे आहे. यामुळे उर्जा निर्माण होवून शरीर सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल. हे पवणपुत्र हनुमान या कलियुगात भ्रष्टाचार एवढा शिगेला पोहोचला आहे की मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने भ्रष्टाचार, बेरोजगारी ,भुकमरी, कुपोषण, शैक्षणिक समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या व महागाईच्या रूपात असुरी शक्ती निर्माण झाली आहे. असुरी शक्तीमुळे आज सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.या कठीण प्रसंगी हे पवनपुत्र हनुमंता वायुरूपात या धर्तीवर प्रगट हो आणि वाममार्गाने चल-अचल संपत्ती कमवीणाऱ्यां असुरांना त्यांची जागा दाखवून सर्वसामान्यांना महागाईच्या संकटातून बाहेर काढ.कारण मुठभर राजकीय पुढाऱ्यांच्या भ्रष्टाचाऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.अशा संकट प्रसंगी हे संकटमोचन महाबली हनुमान आपण कोणत्याही रूपात पृथ्वीतलावर धावुन यावे अशी आपल्या चरणी प्रार्थना करतो.आज हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून सर्वांनीच वृक्षारोपणाचा संकल्प करावा यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल.यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली व मानव-जीवजंतुंना शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल.असे जर झाले तर प्रत्येक झाडात,पानात, फुलात व फळात आपल्याला महाबली हनुमानजींचे दर्शन अवश्य होईल.कारण महाबली हनुमान नेहमीच निसर्गाच्या सानिध्यात रहायचे.जय हनुमान.



**मुखाने बोला;जय जय हनुमान**

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# साकळाई उपसा सिंचन योजनेला मंत्रिमंडळाची मंजुरी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

मुंबई : श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी जीवनदायी ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली असून, या योजनेमुळे ३२ गावांतील सुमारे १०,००० हेक्टर क्षेत्राला पाणीपुरवठा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे दुष्काळी भागाला मोठा दिलासा मिळणार असल्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.



या योजनेसाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या व मान्यता वेळोवेळी बैठका घेऊन मिळविण्यात आल्या. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी पाहिलेले साकळाई योजनेचे स्वप्न पुढील चार वर्षांत पूर्ण करण्याचा निर्धार राज्य शासनाने केला आहे.

या योजनेअंतर्गत म्हसेगाव येथून चार टप्प्यांमध्ये पाणी उपसा करून अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्यातील ३२ गावांमध्ये विकेंद्रित जलसाठ्यांद्वारे पाणी पुरविण्यात येणार आहे. यामध्ये अस्तित्वातील लघुपाटबंधारे तलाव, पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे तसेच गाव तलावांचा समावेश आहे. सिंचनासाठी १.६० टीएमसी व पिण्यासाठी ०.२० टीएमसी असा एकूण १.८० टीएमसी पाणी वापर नियोजित करण्यात आला आहे.

या योजनेत घोड धरणाच्या जलाशयातून मौजे म्हसे येथे पंपगृह क्रमांक १ उभारण्यात येणार असून, पंपगृह क्रमांक १ ते ४ आणि वितरण कुंड क्रमांक १, २ व ३ यांच्या माध्यमातून चार टप्प्यांमध्ये सुमारे २०८.३४ मीटर उंचीपर्यंत पाणी उचलण्यात येणार आहे. हे पाणी चिखली व घुटेवाडी येथील डोंगरावरील वितरण हौदात सोडण्यात येईल. त्यानंतर गुरुत्वीय बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे लाभक्षेत्रातील ३२ गावांतील सुमारे १९६ तलावांमध्ये पाणी सोडण्याचे नियोजन आहे.

दुष्काळग्रस्त भागाला पाणी मिळावे यासाठी लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी देखील दीर्घकाळ पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या निर्णयामुळे योजनेच्या सर्व टप्प्यांना गती मिळाली आहे असे, जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांनी स्पष्ट केले.

# अनुदानित रासायनिक खतांचे वितरण आता 'फार्मर आयडी'वर होणार कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानित रासायनिक खतांच्या वितरणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी आता 'फार्मर आयडी'चा वापर करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.



केंद्रीय कृषी मंत्री व शेतकरी कल्याण मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली फार्मर आयडीसह इतर विषयांवर ऑनलाईन बैठकीप्रसंगी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली. ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडीचा वापर करून देशातील पहिला पायलट प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे खतांचे वितरण अधिक नियोजनबद्ध, अचूक आणि पारदर्शक पद्धतीने होणार असून, शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ थेट आणि योग्य पद्धतीने मिळणार आहे. तसेच बनावट व्यवहारांना आळा बसून प्रणाली अधिक विश्वासार्ह होणार आहे, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

या बैठकीत महाराष्ट्रात ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत सर्वाधिक प्रमाणात फार्मर आयडी तयार करण्यात आल्याबद्दल केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे अभिनंदन केले. तसेच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना केवळ चार दिवसांत सर्वाधिक निधीचे वितरण करण्यात आल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले.

केंद्रीय मंत्री चौहान यांनी पुढील काळात सर्व योजनांमध्ये फार्मर आयडीचा वापर वाढविण्याच्या सूचना दिल्या असून, महाराष्ट्राचा हा उपक्रम इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे..

# चिंचोलीमाळीत रानडुक्करांच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा कान फाटला ; महिलेचा पाय मोडला

केज,-तालुक्यातील चिंचोलीमाळी शिवारात रानडुक्करांनी उच्छाद मांडला असून सोमवारी वारी ( दि. ३०,) पहाटे दोन वाजण्याच्या दरम्यान आपल्या गठ्याकडे चाललेल्या शेतकऱ्यावर रानडुक्कराने हल्ला करून धडक दिल्यामुळे शेतकरी पाण्याच्या हौदात पडून त्याचा कान फाटला. तर दुपारी तीनच्या दरम्यान ज्वारी काढणाऱ्या महिलेसवरही रानडुक्कराने हल्ला करून धडक दिल्यामुळे महिलेचा पाय मोडला आहे. त्यामुळे चिंचोलीमाळी शिवारातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वन विभागाने दखल घेण्याची मागणीशेतकऱ्यातून होत आहे.

चिंचोलीमाळी शिवारातील उसाच्या फडामध्ये सध्या रानडुक्करांचा राहावा असून ऊसासह इतर रब्बी हंगामातील पिकांचेही ते नुकसान करीत आहेत. शेतकरी बाळासाहेब ज्ञानोबा पवार हे रविवारी रात्री वरपगाव रस्त्या लगतच्या शेतात गेले होते. शेजारच्या शेतकऱ्याच्या शेतात बोअर घेत असल्याचे पाहून सोमवारी पहाटे पावणे दोन वाजता ते आपल्या गठ्याकडे जात आसताना पाण्याच्या हौदाजवळ त्यांच्यावर अचानक रानडुक्कराने हल्ला केला. या हल्ल्यात त्यांना रानडुक्कराची जोराची धडक लागल्यामुळे ते शेजारीच आसलेल्या पाण्याच्या हौदात कोसळले . त्यात शेतकरी बाळासाहेब पवार यांचा उजवा कान फाटल्याने त्यांच्यावर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात कानाला टाके घेऊन उपचार करण्यात आले.



तर सोमवारी दुपारी गावातील मनीषा अनिल बजगुडे ही महिला शेतात ज्वारी काढीत असताना अचानक आलेल्या रानडुक्कराने त्यांनाही जोराची धडक दिली. धडक त्यांच्या पायावर बसल्याने त्यांचा पाय मोडला आहे. त्यांच्यावर कळंब (जि. धाराशिव) येथील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. एकाच दिवशी घडलेल्या या दोन घटनांमुळे शेतकऱ्यांसह महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शिवाय रानडुकरे पिकांची नासधूस करीत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकरी वैतागले असून वन विभागाने याची दखल घेऊन रानडुक्करांचा बंदोबस्त करावा. व जखमी शेतकऱ्यांसह महिलेस आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे.

# सेवालयाच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश

लातूर : सोलापूर येथे झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव स्पर्धेत हासेगावच्या सेवालय बालगृहातील एचआयव्ही संक्रमित अनाथ विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन एका सुवर्णपदकासह अन्य पारितोषिके पटकावत यश संपादन केले आहे.




राज्य शासनाचा महिला व बाल कल्याण विभाग व सोलापूर येथील सिंहगड इन्स्टिट्यूटच्यावतीने पहिल्यांदाच राज्यस्तरी चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात राज्यभरातून ९०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यात छत्रपती संभाजीनगर विभागातून निवड झालेल्या हासेगावच्या सेवालय बालगृहातील मुलांनी लातूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले. लातूर जिल्ह्यातून एकूण ८ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यात एकट्या सेवालय बालगृहातील ५ मुलांचा समावेश होता.

या महोत्सवात सेवालातील विद्यार्थ्यांनी निबंध, चित्रकला, वक्तृत्व, बुध्दिबळ, कॅरम, खो-खो, सुंदर हस्ताक्षर, मशाल धाव, रिले या स्पर्धांमध्ये सहभागी होत विजय मिळविले आहेत.

सेवालयातील मुले ही एचआयव्ही संक्रमित आहेत. सर्वसामान्यांप्रमाणेच या विद्यार्थ्यांनीही स्पर्धेत सहभागी होऊन चाचा नेहरू महोत्सवात आपली मोहोर उमटविली आहे.

मुलांच्या या यशाबद्दल सेवालय बालगृहाचे संस्थापक प्रा. रवी बापटले यांच्यासह, प्रा. शैलजा बरुरे, प्रा. मनोज मोठे, रचना बापटणे, अधीक्षिका पूजा जयगावकर यांनी कौतुक केले आहे.

# नद्यांच्या प्रदूषण नियंत्रणावर लक्ष ठेवण्यासाठी ऑनलाईन यंत्रणा उभारा पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे

मुंबई : नद्यांमधील प्रदूषण नियंत्रणासाठी सतत तपासणीसाठी ऑनलाईन यंत्रणा उभारण्याबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी बैठक घेतली. 'नमामी गंगा' उपक्रमातील पद्धतीचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.



पर्यावरण मंत्री मुंडे म्हणाल्या की, राज्यातील नद्यांतील प्रदूषण नियंत्रणासाठी तपासणी यंत्रणा ऑनलाईन व्हावी, यासाठी यंत्रणा उभारण्यात यावे. नमामी गंगे अभियानात ज्या प्रकारे यंत्रणा उभारण्यात आली त्याचा अभ्यास करून तशी यंत्रणा महाराष्ट्रात उभारण्यात यावी. तसेच यासंदर्भात एक ॲप तयार करण्यात यावे.

यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, सहसंचालक (जल) जगन्नाथ साळुंखे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार हे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# भारतीय दलित पँथर साजरा करणार समतेच्या संस्कारांचा पंधरवडा: कर्मयोध्दा अंबादास शिंदे

लातूर□:भारतीय घटनेच्या माध्यमातून समानतेवर उभा राहिलेला लोकशाहीवादी भारतीय समाज,पुन्हा एकदा विषमतेच्या विषाने गुदमरून टाकण्याचा निष्फळ प्रयत्न आर.एस.एस,प्रणित विविध पक्ष संघटना मोठ्या ताकतीने करीत आहेत.त्यांचे वांझोटे प्रयत्न मोडीत काढण्यासाठी भारतीय दलित पँथर समतेचा संस्काराचा पंधरवाडा कार्यक्रम राबविणार असून,त्याची सुरुवात दिनांक ०६एप्रिल २०२६ रोजी स्मृतीशेष प्रा.नागनाथ गुंडाप्पा स्वामी यांची जयंती साजरी करून करण्यात येणार आहे,११ एप्रिल २०२६ महात्मा ज्योतिराव फुले , १४ एप्रिल विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर , १९ एप्रिल महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करून ह्या समतेच्या पंधरवड्याची समाप्ती केली जाईल, असे भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोद्धा अंबादास सैदू शिंदे यांनी सांगितले.

त्यांनी सांगितले की,गेल्या दीड दशकापासून आर.एस.एस ,प्रणित विविध पक्ष संघटनांच्या माध्यमातून,समाजात असमानतेच्या संस्कारांची विषारी पेरणी विश्वासघाताने छुप्या पद्धतीने बहुजन समाजात केली जात आहे. आणि त्याचाच परिपाक म्हणून समाजात सर्व स्तरात अराजकता, गुन्हेगारी, अशांतता,बेरोजगारी, आणि आणिती,अमानुषता बोकाळल्याचे चित्र आहे.

या आर.एस.एस. चे विषमतावादी कार्यकर्ते अंधभक्त,बऱ्याच दिवसांपासून विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीत सामील होऊन,विविध समाजसेवेचे कार्य करत असल्याचे भासवून बहुजन समाजाला,आंबेडकरी समाजाला भ्रमित करण्याचे कार्य हे लोक मोठ्या सीताफीने करत आहेत. आणि येणकेन प्रकारे मनूला अभिप्रेत असलेली विषमता,अज्ञान,भय,आणि दैववाद,ते पुन्हा या समाजात पेरून मनुवाद-ब्राह्मण धर्म या भारतीय समाजात बळकट करण्याचे दिवा स्वप्न ते पाहत आहेत. आणि त्यासाठी बहुजन समाजातीलच काही अल्पज्ञानी,मतलबी,आत्मसन्मान नसलेल्या लोकांचा वापर करत आहेत.

समतेवर आधारित समाज निर्मिती करण्यासाठी जो संघर्ष वरील समतानायकांनी, समता प्रस्थापित करण्यासाठी केला. त्या संघर्षाचे, त्यांनी घेतलेल्या परिश्रमाचे,आणि त्यांच्या कार्याची जागृती करण्यासाठी म्हणून,वरील महापुरुषांच्या जयंती साजरी करून केला जाणार हा समतेचा पंधरवाडा विविध समाजोपयोगी दिशादर्शक कार्यक्रमाने ओतप्रोत भरलेला असेल.

हा समतेच्या संस्काराचा पंधरवाडा साजरा करत असताना,अनेक समतावादी,समता,लोकशाही,आणि मानवतावादी मूल्यांवर विश्वास असणाऱ्या,पक्ष-संघटनांना सोबत घेऊन, हा समतेच्या संस्काराचा पंधरवाडा संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केला जाईल,असेही भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोद्धा अंबादास सैदू शिंदे यांनी सांगितले. त्याचाच एक भाग म्हणून पूर्ण लातूर जिल्हाभर हा पंधरवाडा मोठ्या दिमाखात फक्त नाचूनच नाही तर विविध समाज उपयोगी कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जाईल,त्यासाठीच्या नियोजन समितीचे अध्यक्ष रणजित आचार्य व ज्येष्ठ पँथर प्रा.शिवशरण हावळे ,भारतीय दलित पँथरचे लातूर जिल्हाध्यक्ष एस.बी.मांदळे हे प्रयत्नशील आहेत असेही त्यांनी सांगितले.

# ठाणे महानगरपालिकेने केली ८७८ कोटी रुपयांच्या विक्रमी मालमत्ता कराची वसुली

ठाणे: ठाणे महापालिकेमार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये ८७८.३७ कोटी रुपये इतका विक्रमी मालमत्ता कर संकलित करण्यात आला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता ९१५ कोटी इतके अर्थसंकल्पीय उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले होते. या उद्दिष्टाच्या ९६ टक्के एवढा मालमत्ता कर संकलीत करण्यात महापालिकेस यश मिळाले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील करदात्यांनी दिलेल्या या प्रतिसादाबद्दल महापौर शर्मिला पिंपळोलकर, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी करदात्यांचे आभार मानले आहेत.

मागील सन २०२४-२५ मध्ये रु. ८१० कोटी कर संकलन झाले होते. त्याच्या तुलनेत यावर्षी रु. ६८.३७ कोटी अधिक महसूल प्राप्त झाला आहे.

करवसुलीसाठी केले अथक प्रयत्न-मालमत्ता कर संकलनात वाढ होण्यासाठी महापालिकेमार्फत विविध प्रभावी उपाययोजना राबविण्यात आल्या, त्यामध्ये आर्थिक वर्षाच्या प्रारंभीच ऑनलाईन देयके उपलब्ध करून देणे, करदात्यांना तात्काळ प्रिंट देयके वितरण करण्यात आले.

तसेच ऑनलाईन तसेच सर्व संकलन केंद्रांवर कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. धनादेश, डीडी, डेबिट/क्रेडिट कार्डद्वारे भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान सुट्टीच्या दिवशीही संकलन केंद्र सुरू ठेवण्यात आली होती.

ऑटो रिक्षाद्वारे जनजागृती, गृहनिर्माण संस्थांमध्ये मोबाईल व्हॅन कॅम्प, एसएमएसद्वारे कर भरण्याचे स्मरण देण्यात आले.

त्याचबरोबर, ज्या करदात्यांनी विहीत मुदतीत कर भरलेला नाही, अशा करदात्यांच्या मालमत्तेवर वॉरंट बजावून जप्ती, सेवा खंडीत करणे व इतर कारवाई करण्यात आली.

मालमत्ता करवसुलीबाबत महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी वरिष्ठ स्तरावर नियमीत आढावा घेऊन मार्गदर्शन केले. तसेच, प्रभाग स्तरावरील उप आयुक्त, सहायक आयुक्त, कर निरीक्षक, वसुली लिपीक व सर्व कर्मचारी यांनी मालमत्ता कर संकलनाकरिता अथक प्रयत्न केले. मालमत्ता कराची वसुली प्रभावीपणे करण्यासाठी समाज माध्यम व प्रसार माध्यमांचाही उपयोग झाल्याची माहिती उपायुक्त (मालमत्ता कर) जी. जी. गोदेपुरे यांनी दिली.

डिजिटल भरणा करण्यास करदात्यांची पसंती- ठाणे महापालिकेने करदात्यांना कर भरणे सुलभ व्हावे यासाठी तंत्रज्ञानावर आधारित पर्याय उपलब्ध करुन दिले. त्यामुळे ८७.३७% मालमत्ता कर हा डिजीटल व इतर माध्यमातून संकलित झाला आहे. त्यामुळे शासनाने डिजिटल इंडिया या उपक्रमासही महापालिकेच्या कृतीने सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

प्रभागनिहाय कर संकलन (कोटी रु.)

१.उथळसर ५२.५८
नौपाडा-कोपरी ९७.०६
कळवा २७.७६
मुंब्रा ४५.०३
दिवा ४३.४३
वागळे इस्टेट ३५.२७
लोकमान्य सावरकरनगर ३१.७१
वर्तकनगर १२०.४०
माजिवडा-मानपाडा २३६.५१
मुख्यालय व इतर १८८.६२
एकूण : ८७८.३७ कोटी

तक्ता २ -मालमत्ता कर संकलनाचे प्रकार

कर भरण्याचे मार्ग- संकलनाची टक्केवारी
धनादेश / डीडी ५५.६७%
ऑनलाईन ३१.६८%
रोख १२.६३%
डेबिट / क्रेडिट कार्ड ०.०२%

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कराची देयके दि. ०१ एप्रिल २०२५ रोजी तयार करून एसएमएस व ऑनलाईन लिंकद्वारे करदात्यांना उपलब्ध करून देण्यात आली होती. या सुविधेला ठाणेकर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नवीन आर्थिक वर्षासाठी दिलेले उद्दिष्ट गाठण्यासाठी मालमत्ता कर विभाग नियोजनबद्ध प्रयत्न करेल, असा विश्वास महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी व्यक्त केला आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.